# प्रभुतरुण

| वर्ष ५१ | अंक ०९ | मुंबई | एप्रिल, २०१८ | पाने ६ | किंमत रु. १ |
| --- | --- | --- | --- | --- | --- |

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**

*कार्यकारी संपादक मंडळ* : **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटये**

*संपादकीय*

## परत फिरा...

**—सुहासिनी कीर्तिकर**

मन नेहमीच काळाला पालाण घालून सतत मागे मागे जात असतं. भूतकाळात रमतं. खरं तर प्रत्येक क्षण जगताना प्रत्येकानं तो जाणीवपूर्वक नसतोच जगलेला. प्रत्येकाच्या आयुष्यातला प्रत्येक क्षण 'घटिका गेली, पळे गेली' असा 'झणाणा' मागे मागेच पडत असतो. त्या क्षणी त्याचं भानही आपल्याला नसतं. कारण? कारण मनापेक्षाही काळाशी, वर्षांशी, दिवसांशी, तासांशी, क्षणांशी बांधलेलं असतं आपलं क्रियाशील शरीर. सकाळी झाली की उठा, दिवसाशी झोंबी घ्या, रात्र झाली की झोपा... एक दिवस पार पडला! या शरीरानं पार पाडलेली रोजची क्रियाकर्म म्हणजे आपल्या घरादारानं, संस्कृतीनं लावलेली सवय. पण.... पण; असं जगता जगता वय वाढत जातं, काळ मागे पडत जातो. अशावेळी मागे पडणाऱ्या काळाला शरीरानं नाही; मनानं स्वत:बरोबर बांधलेलं असतं. म्हणूनच त्या मनाला सहज निघून गेलेला जुना काळ आठवत रहातो. 'हाँ। वही शहर है, वही गली, वही घर सब कुछ।'

सब कुछ वही तो नही है; लेकिन है वही उसी जगह'... गुलजार यांच्या या ओळींतून पाझरणारा 'सर्व काही तेच नाही' असा भाव अशाच वेळी मनात जाग आणतो, एक हलकीशी वेदना मनात ठुसठुसत रहाते. बालपण, तारुण्य, प्रौढत्व या अवस्थांनी आपल्याला यशस्वीपणं गोंजारलं असलं तरी; म्हणजे मनात कृतकृत्यता भाव दाटलेला असला तरी या दाट, समृद्ध द्रावणावर एक तवंग पसरतोच - जुन्या काळातल्या त्या त्या अवस्थेतील भारलेल्या, भारावलेल्या तपशीलांच्या आठवांचा. मग जुन्या काळातील घरची-दारची नातेवाईक माणसं आठवतात. सवंगडी आठवतात. त्यांच्याबरोबर रंगलेले खेळ आठवतात. (तारुण्यावस्थेतले रंगलेले 'ते' खेळही!) शाळा, कॉलेज, व्यावसायिक वातावरण आठवते. आपल्याच संसार नामक जगण्यातील जुन्या घटना नव्याने अन्वय लावत मनात अल्लाद जाग्या होतात. त्या काळचा भोवतालचा परिसर आठवतो. झाडंझुडं, मैदानं, ओटे गोटे, रस्तेदेखील या आठवणीत जीवंत होतात. ती इतकी जीवंत होतात की त्यांना बिलगलेला भूतकाळ अळूच्या पानावरून अलगद निसटून जाणाऱ्या पाण्याच्या थेंबासारखा गळून पडतो. मग त्याच निसर्गातील पाखरांचा भूतकाळदेखील पंख फडफडावत आपल्या मनाशी... मनाच्या तळाशी जीवंत होतो. ही पाखरं काही जगावेगळी नसतात. कावळे, चिमण्या, कबुतरे अशीच. कधी तरी त्यात अभ्रकी पंखांचे चतुर उतरतात. कधी बागेतील फुलांवर टेकली न टेकली करणारी रंगबिरंगी फुलपाखरं असतात. वसंताला देखणं करणारे बुलबुल कधी त्यात असतात. क्वचित एखादी जखमी घार असते. सदानंद रेग्यांना दिसलेली संथ दुपारी 'आकाशातून घिरट्या घाली एकच घार' आपल्याही अवकाशात कधी घिरट्या घालून गेलेली असते. आठवणींशी नाळ जुळलेली ही सर्व पक्षी मंडळी आपल्या मनावर पाखर घालीत असतात.

परवा 'जागतिक चिमणी दिन' साजरा झाला; तेव्हा भूतकाळातल्या चिमण आठवणी जाग्या झाल्या; तीव्रतेनं वाटून गेलं की खरंच आज 'सब कुछ वही नही है।' चिमणी, कावळा, राघू, मैना हे एकेकाळचे आपले जगण्यातले सवंगडी. त्यांना आपण गोष्टींतून, गाण्यांतून, जगण्यांतून सतत बरोबरीनं वागवत आपलं जगणं समृद्ध केलं होतं. होतं ना? बाळ जन्माला आलं की त्याला पाळण्यात जोजवायचं. त्या बाळाची नजर तयार व्हावी, कानांना मधुर काही ऐकायला मिळावं म्हणून पाळण्याच्या चौकटीवर 'चिमणाळं' टांगलं जायचं. चिवचिव आवाज करणारं. भिरीभिरी फिरणारं, रंगीबेरंगी. बाळ थोडं मोठ्ठं झालं की 'मंमं' भरवतानाही आई या सवंगड्यांनाच साथीला घेत म्हणणार, 'एक घास चिऊचा, एक घास काऊचा.' त्या बाळाला बोलायला यायला लागलं की या पाखरांचेच आवाज त्याला धडे देणार - चिमणी करते 'चिव चिव'. कावळा काय करतो? 'काव, काव.' कबुतरं कसं म्हणते, 'गुटरगूं, गुटरगूं...' मग बाळजीव वाढीला लागला की दिवसाच्या सगळ्या कामांना बांधलेला असायचा चिऊकाऊच्या गोष्टींचा घुंगुरवाळा. 'एक होती चिऊ. एक होता काऊ. चिमणीचं घरटं होतं मेणाचं. कावळ्याचं घरटं होतं शेणाचं. एकदा काय झालं.. मोठ्ठा पाऊस आला. कावळ्याचं घर गेलं वाहून...!' काळाच्या ओघात आता चिमणी कावळ्याचं माणसाच्या आयुष्यातलं घरच वाहून गेलंय! पण त्या काळी मूल हलके हलके मोठं होत धूळाक्षरं गिरवू लागलं की काळीभोर पाटी सुकावी म्हणूनही गाणं म्हणे ते - 'चिमणी चिमणी पाणी दे, कावळ्या कावळ्या वारा घाल'. पाटीपेन्सिल पाठी पडत मग पुस्तकांचं जग सुरू होई. त्यात छान छान कविता असत. (खरंच 'छान छान' असत.) 'चिमणे इवलाले बीज घेत तिथे होते झोप' म्हणताना कळे की 'चिमणे' म्हणजेच इवलाले. छोटेसे. त्या वयातल्या आपल्यासारखे. मग कधी तरी ना. वा. टिळकांच्या 'केव्हढे हे क्रौर्य?' मधली 'आई' असलेली चिमणी डोळ्यांना पाणी आणी. तिचे 'मातीत ते पसरले अति रम्य पंख' मोठ्ठ्यानं एकसाथ कविता म्हणताना तालबद्ध वाटत. पण 'रम्य' कधीच वाटत नसतं. करूण, करूण वाटत. माणसांचा (म्हणजेच आपला!) राग राग येई. 'चिमणी येऊन नाचून. गाऊन काय म्हणे तुला? हस रे माझ्या मुला' असं म्हणणारी चिमणी मात्र आवडून जाई. अन् एखाद्या कवितेतून तिचं स्वाभिमानी, स्वातंत्र्यप्रेमी रूपही फार फार अभिमानास्पद वाटायचं. 'जळो तुझा पिंजरा मेला, राहीन मी घरट्या विना' म्हणत रानात उडून जाणारी चिमणी मनात कणखर बाणाच जागवायची तर 'बाळाचेही नाव घेता जागी झाली चिऊताई' असं पुन्हा आईचंच रूप दाखवणारी कुसुमाग्रजांची कविता आपल्या घरातल्या आईचंच रूप असायची.

कविता, गोष्टींतून सोडाच. घरातल्या रोजच्या दैनंदिनीतही चिमणी असायचीच. सकाळी सकाळी अंगणभर पसरलेल्या उन्हात न्हाऊन चोचीनं माती उकरत अळ्या शोधणाऱ्या 'भोरड्या' (म्हणजेच चिमण्या!) भुर्ररकन् उडून गेल्या की धुळीचा एक 'उडता गालिचा' त्यांच्यासवे तरंगायचा. पूर्वी 'निवडण' असे. म्हणजे डाळ, तांदूळ सामूहिक पद्धतीने गप्पा मारत मारत निवडले जात. (म्हणूनच लालन सारंगांनी 'तांदूळ निवडता निवडता' हा आत्मपर एकपात्री प्रयोग सादर केला ना!) अशावेळी भातकण असलेले तांदूळ सोलले न जाता वाटीत घेऊन मग अंगणात टाकले जात. चिमण्यांसाठी! ते चोचीनं सोलून त्यातला तांदळाचा दाणा काढतानाचा चिमणीचा 'संसार' पाहण्याजोगा असे. तेव्हा 'टूथपेस्ट' तरी कोठे होत्या? असलंच तर दंतमंजन. ('माकड छाप'!) भाताच्या गिरणीतून 'तूस' आणायचं. ते पत्र्यावर उन्हात वाळवायचं. त्यात कोळशाची पूड, कापूर वगैरे मिसळायचं. डबीत भरायचं. (हां! 'प्लॅस्टिक' नव्हतं हं तेव्हा!) तर; हे तूस पसरलेलं असताना त्या तापल्या पत्र्यावर सायंकाळी चिमण्यांचा थवा उतरायचा. चुकून राहून गेलेला तांदळाचा दाणा टिपण्यासाठी. अशा वेळी त्यांचा कलकलाट संध्याकाळ गहिरी करायचा. माणसांचं प्रेम होतं तेव्हा

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय
(पान १ कॉलम ४ वरून)
चिमण्यांना. लोकमान्य टिळकांनी तुरुंगात 'गीतारहस्य' लिहिताना त्यांच्या अंगाखांद्यावर चिमण्या बिनधास्त खेळायच्या म्हणे. सवंगडीच होत्या त्या आपल्या.

या चिमण्यांचा कलकलाट, किलबिलाट मात्र आपण आजही भाषेतून जीवंत ठेवलाय. शाळा सुटली रे सुटली की कोंडलेली मुलं भराभरा बाहेर पडताना नुसता 'किलबिलाट'च असतो! कवितेतील 'चिमण्यांची पोरे भारी गोंगाट करिती' इथे आपल्याच मुलांवर प्रतिरोपित झालेलं असतं. घरच्या 'लाडी'चं किंवा लाडोबाचं नाव आपण आवडीनं 'चिऊ' असंच ठेवलेलं असतं. चित्रकार गोपाळराव देऊसकरांच्या द्वितीय पत्नीचं लाडाचं नाव 'चिऊ' असंच होतं ना! (हे देऊसकर म्हणजे पुण्यातल्या बालगंधर्व नाट्यगृहातील बालगंधर्वांची चित्र काढणारे अन् त्यांची 'चिऊ' म्हणजे नाट्यकर्मी जुईली देऊसकर.) कधी तरी नको तिथं फारच वाह्यात्पणा करत एखादं गाणं लोकप्रिय होतं - 'चिमणी उडाऽऽली भुर्रऽऽ, त्याचा पोपट पिसाटला.' श्शी! डोळ्यांना दिसणारा चिऊताईचा पिंगट, मुलायम स्पर्श अन् रंगच अशावेळी उडून जातो बाबा!

तर असं हे भूतकाळातून सोबत करत करत वर्तमानाच्या ओवरीत उतरलेलं चिमणीपुराण! आता घराची अंगणं गेली. भोवतालची झाडं जमिनीसपाट झालीत. पाट्यापेन्सीलीचं जग मागे पडलं. ज्या जगात एखादा पेरू वगैरे वाटून घ्यायचा असेल तर तो 'चिमणदातां' नी चावला जायचा! असे चिमणदात गेले. चिऊताईच्या कविता गेल्या. आता 'जॅक अँण्ड जिल' जाताहेत आपले गडगडत आणि मनीमाऊ इंग्लंडच्या राणीच्या सिंहासनाखालचा उंदीर शोधतेय. चिमण्या गेल्या म्हणून खिडक्यांशी चिमणपाळणे टांगून त्यांना बोलावण्याचे प्रयत्न चालू आहेत म्हणा! पण जुन्या काळाबरोबर हे चिमणीचं आपल्या जगाशी असलेलं नातं दुरावलंच. म्हणूनच तर जागतिक चिमणी दिन पाळायचा. (तो याच महिन्यात आपण साजरा केला.)

त्यांना म्हणायचं, 'या चिमण्यांनो, परत फिरा घराकडे अपुल्या.' पण त्यांना हवी तशी घरं तरी आहेत का या यांत्रिक युगात? 'सब कुछ वही तो नही है।' हेच खरं. तरीही 'एक चिमणी आली, एक दाणा घेऊन गेली' ही न संपणारी गोष्टच राहो अजरामर.

*

**उद्यम्**

# सगळ्यांना आवडणारा व्यवसाय- कप केक

**-सुदेश प्रबोध देसाई**

विचार करा तुमच्यासमोर पाईनॅपल कप केक, स्ट्रॉबेरी कप केक, चोको चिप्स् कप केक, वॉलनट ब्राऊनी कप केक, मावा कप केक, रेड व्हेलवेट कप केक हे सगळे कप केक तुमच्यासमोर फ्रेश सर्व्ह केले तर तुम्हाला आवडेल का? (तोंडाला पाणी सुटले ना...) आम्ही बऱ्याच लोकांसमोर आणतो तर ते लगेच हातोहात विकले जातात. तुम्हालापण असा फास्ट विक्री होणारा व्यवसाय करायला आवडेल का? कप केक हा दिसायला छोटा पण करोडोचा फायदा देणारा व्यवसाय आहे. भारताच्या बेकरी व्यवसायामध्ये १२,००० कोटी अनब्रँडेड सेक्टर आहे, जिथे अजूनही ब्रँडिंगशिवाय प्रॉडक्ट विकले जातात त्यामध्ये कप केक व्यवसायही येतो. जर आपण ब्रँडेड कप केक बाजारात आणले तर आपल्याला भरपूर नफा होऊ शकतो हे कसे ते आपण जाणून घेवू या...

❖ **कप केक बनविण्याची कृती**
**रेड व्हेलवेट कप केक**

***साहित्य:***

| क्र. | साहित्य | प्रमाण |
|---|---|---|
| १ | बटर मिल्क | ३/४ कप |
| २ | सेल्फ रेझिंग फ्लॉर | १ कप |
| ३ | बेकिंग पावडर | १/४टीस्पून |
| ४ | कोको पावडर | १ टेबलस्पून |
| ५ | बटर (रूम टेम्परेचर) | १/४कप |
| ६ | पिठी साखर | ३/४कप |
| ७ | व्हनिला इसेन्स | १टीस्पून |
| ८ | लिक्विड रेड फ्रूट केक | १ टेबलस्पून |
| ९ | बेकिंग सोडा | १/२टीस्पून |
| १० | व्हिनिगर | १/२ टीस्पून |
| ११ | मीठ | १/४ टीस्पून |

***आईसिंगसाठी साहित्य***

| क्र. | साहित्य | प्रमाण |
|---|---|---|
| १ | क्रीम चिझ | ६४ ग्रॅम |
| २ | बटर (रूम टेम्परेचर) | ५० ग्रॅम |
| ३ | आईसिंग शुगर | १५० ग्रॅम |
| ४ | व्हॅनिला इसेन्स | १टीस्पून |

*कृती:*

१. बटर मिल्क व व्हाईट व्हिनिगर एका भांड्यात मिक्स करून घेणे.
२. सेल्फ रेझिंग फ्लॉर, कोको पावडर, बेकिंग सोडा, व मीठ तीनदा चाळून घेणे.
३. दुसऱ्या भांड्यात बटर घेऊन त्यात पिठी साखर मिक्स करणे व त्यात व्हनिला इसेन्स व रेड कलर मिक्स करणे.
४. वरील मिश्रणात दूध मिक्स करणे व बीट करणे.
५. मैद्याचे मिश्रण वरील मिश्रणात मिक्स करून घेणे व बीट करून घेणे.
६. व्हिनिगर व बेकिंग सोडा मिक्स करून लगेच वरील मिश्रणात मिक्स करणे. वरील मिश्रण कप केकच्या लाइनरमध्ये ३/४पर्यंत भरणे.
७. १८०° प्रिहिटेट ओव्हनमध्ये २० ते २५ मिनिटे बेक करणे.

❖ **ह्या व्यवसायाची मशिनरी**

१) प्लेनेटरी मिक्सर, २)ओव्हन, ३) वजन काटा, ४) टीस्पून/ टेबलस्पून, ५) सिलिंग मशिन, ६) वर्किंग टेबल, ७) फ्रिजर व इतर

❖ **कॉस्टिंग**

१ किलो बॅटरमध्ये ५० कप केक होतात, रु. १५० मध्ये ५० कप केक तयार होतात. म्हणजे जवळजवळ रु. ३ मध्ये १ कप केक होतो.

मार्केटमध्ये १ कप केक रु. १० ते रु. ६० पर्यंत विकले जातात.

जर आपण १० ट्रेची मशीन घेतली तर एका ट्रेमध्ये ४० कप केक बसतील. तर मग एका मशीनमध्ये एकावेळी ४०० कप केक होऊ शकतात. तेपण अर्ध्या तासामध्ये म्हणजे एका दिवसात आपण ५००० कप केक बनवू शकता. जर आपण २ मशीन घेतल्या तर १०,००० कप केक दिवसाला होऊ शकतात.

एका कप केकमागे आपण रु. ५ प्रॉफिट ठेवला तर आपल्याला १०,००० कपास रु. ५प्रति कपप्रमाणे रु. ५०,००० नफा दिवसाला होऊ शकतो.

तसेच २५ दिवस काम केले तर...
२५ दिवस x रु. ५०,००० = रु. १२,५०,००० नफा प्रति महिना
तसेच १२ महिने काम केल्यास तर
१२ x रु. १२,५०,००० = रु. १,५०,००,००० नफा प्रति वर्ष

हा नफा जर तुम्हाला जास्त वाटत असेल तर १००० कप केकच दिवसाला करा. मग तुम्हाला रु. १५,००,००० वार्षिक नफा होईल. आणि वरील नफा तुम्हाला कमी वाटत असेल तर २०,००० कप केक दिवसाला बनवा व ३,००,००,००० रुपये नफा वर्षाला कमवा.

❖ **मार्केटिंग**

कप केकचे मार्केटिंग खूप सोपे आहे. जर आपण १० कप केकचे एक पॉकेट केले आणि ५ व्हरायटी सुरुवातीला बाजारात आणल्या तर एका दुकानामध्ये २५ पॉकेट विकले जातील. (२५० कप केक) जर आपल्याला १०,००० कप केक दिवसाला विकायचे असतील तर आपल्याला ४० दुकानात पोहोचावे लागेल. हे ४० दुकानाचे टारगेट एक सेल्समन सहज पूर्ण करू शकतो. ह्या व्यतिरिक्त आपण बिगबाजार, डिमार्ट, अपना बाजार, स्टार बाजार व इतर मोठ्या दुकानांमार्फत विकू शकतो. तसेच आपण ऑनलाईन मार्केटिंग करून व ॲमेझोनसारख्या विक्री करणाऱ्या कंपन्यामार्फत विकू शकतो. तसेच आपण स्वत: फिरून करू शकतो.

अधिक माहितीसाठी संपर्क:
सुदेश देसाई : ९२२३३५७२०७
ई-मेल:
sudesh69desai@gmail.com
www.aaranasolution.com

*

## 'उल्का'

**हेमंत विनायकराव तळपदे**

शेवटी आला तो क्षण आला,
माझ्या मनाला पक्षाघात झाला
काय चुकले? काय उरले?
विचारांती डोक्याचा भुगा झाला
दोन जीवांचा एकच संगम
प्रतीक म्हणोनी सुखात होतो.
माता-पित्याच्या प्राप्त स्नेहात
मी पूर्णपणे तृप्त होतो
आईची नोकरी, बाबांचा धंदा
पाच वर्षाचा संसार सरला
पण दुग्धशर्करी त्या योगात
मिठाचा अंश संशयीरूपे टपकला
आईच्या शीलाचा कोर्टातील पंचनामा
मी अगतिक नजरेने पाहिला
माझ्यावरील त्वां हट्टासाठी
कायद्याचा सारा कीस पडला
समज नव्हती एवढी तेव्हा ही
केवळ इतकेच उमजत होते
आईबाबांचा परस्परी दुरावा
वाढत असल्याचे जाणवत होते
शेवटी रुद्ध मनाच्या न्यायाने
आईच्या पदरात दान टाकले
माझा पूर्ण संभाळ करण्यास
तिला मुक्त वचन दिले
पण माझे मन तेथेच घुटमळले
बाबाही मला हवे होते
त्यांचा मनाला पारखा होऊन
अपूर्ण जीवन सलत होते
शेवटचे बाबांना पाहिले मी
चेहरा त्यांचा निर्विकार होता
जणू सरणावरच्या राखेने त्यांनी
स्वच्छ सुंदर सजविला होता
आता मात्र वीस वर्षांनी
उमजले मला सत्य सारे
शापीत गंधर्वांचे आम्ही वारस
जणू असेच हे जीवन अधूरे

(मोबाईल : ९८२१६०७५९३)

*

काही अद्‌भूत अनुभव

# पाठीराखा

-विनय त्रिलोकेकर

मी आता जे तुम्हाला सांगणार आहे ते फार फार वर्षांपूर्वी घडले; साधारण ५०-६० सालांच्या दरम्यान. ज्यावेळी डेविड सेल्टझरने 'दि ओमेन' ही कादंबरी लिहिण्याचा विचारदेखील केला नसेल. ('दि ओमेन 'त्याने १९७० साली लिहिली)

आपल्यापैकी कित्येक जणांनी प्रथम डेविड सेल्टझर आणि नंतर जॉसेफ हॉवर्ड व गॉर्डन मक्गील ह्यांच्या कादंबऱ्यांवर आधारित 'ओमेन' ह्या चित्रपट-मालिकादेखील बघितल्या असतील. चित्रपटांतील (आणि कादंबरीतील) मुख्य पात्र म्हणजे डेमिअन थॉर्न. डेमिअन हा एका सैतानापासून झालेला मुलगा, जन्माला आलेला एक येशूविरोधक. बायबलमध्येही त्याचा येशूविरोधक म्हणून उल्लेख आहे, असे जाणकार म्हणतात. गोष्ट डेमिअनच्या अवतीभवती फिरत राहते. अगदी त्याला रॉबर्ट आणि कॅथरीन थॉर्न ह्या दांपत्यानी दत्तक घेतल्यापासून ते शेवटपर्यंत. सुरुवातीला डेमिअनला आपल्या सैतानी शक्तीची जाण आणि कल्पना नसते. हळूहळू त्याला त्याची जाणीव होऊ लागते. सैतानाचे अनुयायी, सैतानाचे मदतनीस म्हणा, वारंवार त्याचे एखाद्या पाठिराख्याप्रमाणे रक्षण करीत रहातात, जसे सुरुवातीस त्याची आया, अनेक पशु-पक्षी (डोम कावळा, रानटी कुत्रे), काकांचे बिझनेस पार्टनर आणि शेवटला मोठ्या संकेत सैतानाचे अनुयायी, त्याला त्याच्या ध्येयाकडे जाण्यास मदत करीत राहतात. पुढे मोठेपणी तो थॉर्न साम्राज्यावर आपला कब्जा मिळवण्यासाठी आणि त्यानंतर राष्ट्राध्यक्ष होण्यासाठी धडपड करू लागतो.

'ओमेन' ह्या शब्दाचा 'वाईट संकेत'. हा अर्थ घेऊन ही गोष्ट लिहिण्यात आली. वास्तविक ओमेन म्हणजे शुभ संकेत किंवा अशुभ संकेत. अशाच एका रक्षणकर्त्याची ही कथा.

ह्या शुभ संकेतामुळे मला गंमत आठवली. म्हणे घोड्याची नाल रस्त्यात मिळणे म्हणजे एक शुभ शकुन असतो. मग काय विचारता? आमची आई रस्त्यात मिळणारी प्रत्येक घोड्याची नाल (अख्खी, अर्धी, नालेचा लहान तुकडा देखील- ज्या असेल त्या स्थितीत) घरी आणायची आणि आमच्या दरवाज्याला लावायची. .. आम्ही साऱ्या भावंडानी तिला आळा घातला नसता तर दरवाज्याचा लाकडी भागही दिसला नसता. हा झाला एक गंमतीचा - मजेचा भाग. असो!

तर अशी झाली गोष्टीची सुरुवात. पन्नास सालाचा मध्य, साधारण १९५७ -५८ असावा. मी असेन दहा-बारा वर्षांचा. (गोष्ट नाजूक आणि संवेदनाशील असल्यामुळे पात्रांची खरी नावे गुप्त ठेवली आहेत) त्यावेळी दिनकर असेल ४ ते ६ वर्षांचा एक भाबडा निष्पाप मुलगा. आम्हा दोघांच्या वयात जरी ५-६ वर्षांचे अंतर असले तरी आम्ही एकत्र खेळायचो आणि गप्पागोष्टी करायचो. मला गोष्टी सांगण्याचा छंद, त्यामुळे मीच त्याला गोष्टी सांगत असे. मात्र एके दिवशी त्याने त्याला आलेले विचित्र अनुभव मला सांगितले. त्याने त्यादिवशी माझ्यापुढे आपले मन मोकळे केले असावे. त्यानंतरही त्याने मला तीच गोष्ट कित्येकदा सांगितली असेल, काही फरक-कोणताही बदल न करता. मला आजही त्याची गोष्ट, त्याने सांगितलेला शब्द न शब्द, अगदी अलीकडे घडल्याप्रमाणे आठवतो. गरजेनुसार मी ती गोष्ट थोडाफार बदल करून लिहीत आहे.

डॉक्टर योगेश एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. त्यांच्या स्वत:च्या शस्त्रक्रियेच्या क्षेत्रात निपुण होते. ते एफआरसीएस झालेल्या काही निवडक भारतीयांपैकी एक होते. त्यांच्या कन्सल्टिंग रूममधील शोकेसमध्ये ठेवलेल्या ट्रॉफीज व डॉक्टरांचे विविध पोशाखात घेतलेले फोटो (Wrestlers Red Scorpion and King Kong, Indian bride, An Arab, A Snowman, A boxer) आणि त्यांचा स्वत:च्या हस्तकलेचा वस्तुसंग्रह पाहून त्यांच्यातील विविध पैलूंची जाणीव होत होती. ते उत्कृष्ट चित्रकार आणि शिल्पकार होते. त्यांनी तयार केलेला बसलेला कुत्र्याचा पुतळा इतका खरा व जीवंत वाटे, कोणत्याही क्षणी उठून उभा राहून आपले हात चाटेल व आपली शेपटी हलवून त्याला गोंजारण्यास आपल्याला भाग पाडेल असे वाटायचे. तसे शोकेसमध्ये त्यांच्या शिल्पकलेचे बरेच नमुने पहावयास मिळत होते. नव्हती ती एकच वस्तू - त्यांनी घडविलेला एका ब्राह्मणाचा पुतळा, जो त्यांच्या आलिशान घरातील डॉक्टरांच्या स्वत:च्या खोलीत एका कपाटावर ठेवलेला होता.

असे ऐकिवात आहे की, हा पुतळा त्यांच्या कुटुंबाच्या भटजींचा होता. असे बोलले जाते की, हा सदाशिवभटजी (काल्पनिक नाव) अचूक भविष्यवाणी करावयाचा. एखाद्या वाईट घटनेचे संकेत मिळताच तो त्यावर उपायही सुचवून मार्गदर्शन करीत असे. त्यांनी भविष्य वर्तविल्याप्रमाणे योगेश आपल्या वडिलांच्या पाऊलावर पाऊल ठेऊन एक मोठे हाडांच्या रोग-विकृतीचे तज्ज्ञ डॉक्टर झाले. सदाशिव भटजींनी असेही सांगितले होते की डॉक्टरांचे लग्न त्यांच्याइतक्या श्रीमंत नसलेल्या कुटुंबातील एका मुलीशी होऊन त्यांचा उत्कर्ष होण्यास सुरुवात होईल. आपल्या बायकोच्या सहाय्याने डॉक्टरांच्या हातून मोठे दान-धर्म होणार होते. डॉक्टरांच्या आईचा सदाशिवभटजी आणि त्यांनी सांगितलेल्या भविष्यावर संपूर्ण विश्वास होता. ह्या सर्वावर डॉक्टरांचा कितपत विश्वास? देव जाणो. एवढे मात्र खरे, डॉक्टरांच्या आतील शिल्पकाराला जाणीव झाली असावी ती ही की सदाशिवभटजी एक 'मॉडेल' म्हणून फार उपयुक्त! एक घरबसल्या मिळालेला आयता नमुना! त्या ब्राह्मणाचे शिल्प बनविण्यास डॉक्टरांनी बरेच श्रम घेतले असावेत. भरपूर 'सीटिंग' झाल्या असाव्यात. आणि अखेर सदाशिव भटजींचा अर्धपुतळा तयार झाला आणि तो पाहून भटजी उदगारले, 'मुला, तू माझा आत्माच ह्या पुतळ्यात घातला आहेस रे! हा पुतळा जवळ बाळग. फार कामी येईल'. म्हणूनच असेल हा पुतळा कन्सल्टिंग रूममध्ये न ठेवता डॉक्टरांनी तो स्वत: जवळ ठेवला असावा.

मस्ती आणि वेडेचाळे यामध्ये फारसा फरक नसतो. लहानपणी दिनकर खोडकर आणि मस्तीखोर तर होताच; पण अधूनमधून वेडेचाळे करणे हा जणू त्याचा एक छंद! आमच्या लहानपणी पालकांना तसेच शिक्षकांना आमचे काही चुकल्यास कोणतीही शिक्षा देण्यास मुभा होती. छडीचा मार, ओणवे उभे करणे, खोलीत डांबून ठेवणे- कोणतीही शिक्षा! दिनकरच्या खोडकर स्वभावामुळे त्याला शिक्षा वारंवार होणे स्वाभाविकच! शिक्षेचे मोजमाप त्यांनी कमी-जास्त केलेल्या मस्तीवर अवलंबून असावयाचे. समज देणे, दम भरणे, छडीचा चोप आणि खोलीत एकट्याला डांबून ठेवणे - अशा शिक्षांचा प्रवास दिनकरचा वेळोवेळी होत असे.

एकदा दिनकर बिल्डिंगमधल्या मुलांबरोबर खेळत होता. तळमजल्यावर रहाणारी म्हातारी रोझीबाईला मुलांचा नेहमीच त्रास होत असे. त्यांचे खेळणे, बागडणे तिला बोचत असे. मुलेही काही कमी नव्हती. तिला चिडवणे, तिची छेड काढणे, मुद्दाम तिच्या दाराजवळ आरडा-ओरडा करणे किंवा दारावरील बेल वाजवून पळून जाणे. त्यादिवशी तेच झाले. मुलांनी अतीच केले. तिच्या खिडकीची काच फोडली. रोझीबाईने थेट डॉक्टरांकडे दिनकरची तक्रार केली. दिनकरला मार तर मिळालाच पण त्याची रवानगी वडिलांच्या 'स्टडी रूम'मध्ये झाली. खोलीच्या दाराला बाहेरून कडी लावण्यात आली. दिनकर ओक्साबोक्शी रडत होता. अश्रू त्याच्या गालावरून, नाकावरून घरंगळत ओठावरून तोंडात जाऊ लागले. मात्र घशाची कोरड काही कमी झाली नाही. त्याचे रडणे हळूहळू कमी झाले, आता तो हुंदके देत होता. खोलीत आल्यापासून बराच काळ लोटला होता. खोलीत अंधार झाला होता. दिवे लावण्याचे त्याला भान नव्हते. रडणे पार थांबले, हुंदकेदेखील; पण डोळे पाणावलेले होते. अचानक त्याला खोलीत कोणी तरी बोलत असल्याचा आवाज ऐकू आला. आवाज कपाटावरून येत असल्याचा आभास त्याला झाला. दिनकरने आपले डोळे मोठे करीत कपाटावर पाहिले. त्याला स्पष्ट दिसत नव्हते, कदाचित खोलीतील अंधारामुळे किंवा डोळ्यातील अश्रूंच्या ओलाव्यामुळे म्हणा. बोलण्याचाआवाज ऐकू येत होता पण दिसत असे काही नव्हते. त्याने आपले डोळे हातानेच पुसले. पुन्हा कपाटावर पहिले- काय आश्चर्य! खिडकीतून एक तिरीप पडली होती आणि त्या अंधुक प्रकाशात दिनकरला दिसले- कपाटावरील बाहुले (दिनकर लहानपणी त्या शिल्पकृतीला बाहुलेच म्हणत असे), भटजीची मूर्ती आपल्याला काहीतरी सांगत आहे. काय सांगत होते ते मात्र दिनकरला ऐकू किंवा समजत नव्हते. भटजीचे ओठ हलत होते. इतक्यात दार उघडून त्याचे मम्मी- डॅडी आत आले. डॉक्टरांनी त्याला मिठी मारली, दोघांनी त्याला पुन्हा एकदा समजावले आणि दिनकरकडून परत असे वेडेचाळे पुन्हा न करण्याचे वचन घेतले.

ही घटना उलटून बराच काळ लोटला. दिनकरला ह्या गोष्टीचा आणि आई-वडिलांना दिलेल्या 'प्रॉमिस'चा विसर पडला होता. आणि शेवटी मुले ही मुलेच असतात. तेव्हा त्या सर्व मुलांची मस्ती-मजा, ह्याला चिडव, त्याची छेड काढ, सर्व पहिल्याप्रमाणे चालूच होते. कदाचित त्या प्रसंगानंतरही त्याला अनेकदा लहानसहान शिक्षाही झाल्या असतील. पण स्टडीतील ती घटना परत घडल्याचे त्याला आठवत नाही. आणि मग एके दिवशी.....

तो होता 'धुळी'चा दिवस. दिनकरने आईकडे पिचकारीसाठी हट्ट धरला.

'मम्मी, मी रंग उडवणार नाही, आय प्रॉमिस! पिचकारीत साधं पाणी भरेन.'

नाही, नाही म्हणत आईने शेवटी त्याला एक मोठी पिचकारी घेऊन दिली. पिचकारी हातात पडताच अक्षरशः तो नाचू-बागडू लागला. तो अतिशय आनंदात होता. ती

(पान ५ कॉलम २ वर)

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



संवाद

# गोल्ड रश

-विश्वास अजिंक्य

(मागील अंकावरून)

भौगोलिकदृष्ट्या एका टोकाला असणाऱ्या कॅलिफोर्नियाला एक राज्य म्हणून गोल्ड रशचा खूप मोठा फायदा झाला. सोन्याच्या शोधात तेथे लाखो लोक आले व शोध संपल्यानंतर ते तेथेच स्थायिक झाले. वस्ती वाढल्याने रस्ते, शाळा बांधल्या गेल्या. स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात आल्या. नवीन शहरे उभी राहिली. तेथे आलेल्यांपैकी बहुसंख्य अमेरिकन होते. त्यामुळे ९ सप्टेंबर १८५०ला अमेरिकन संघराज्यात कॅलिफोर्नियाचा अमेरिकेचे ३१वे राज्य म्हणून समावेश झाला. जेथे जेम्स मार्शलना प्रथम सोने मिळाले ती जागा व आसपासचा परिसर आज एक पर्यटन केंद्र झाले आहे. मोठ्या संख्येने तेथे पर्यटक येतात. 'स्टेट हिस्टॉरिक पार्क' म्हणून तो भाग ओळखला जातो. लाकडाच्या ज्या वखारीजवळ प्रथम सोने मिळाले होते; त्या वखारीची हुबेहूब प्रतिकृती त्या परिसरात बांधली आहे व पर्यटकांचे ते एक प्रमुख आकर्षण आहे. त्याकाळात बांधण्यात आलेल्या काही इमारती अजूनही शाबूत आहेत. त्यादेखील पर्यटकांना पहायला मिळतात.

ऑस्ट्रेलियात सोन्यासाठी झुंबड उडाली ती १८५१ मध्ये. ऑस्ट्रेलियातील एडवर्ड हारग्रेव्हज हा भूगर्भतज्ञ असलेला गृहस्थ कॅलिफोर्नियात सोने सापडले तेव्हा सोन्याच्या शोधात तिथे गेला होता. तिथे त्याला आढळून आले की, कॅलिफोर्नियामधील सोन्याच्या खाणीतील दगडांचे प्रकार, त्यांची रचना जशी आहे अगदी तशाच प्रकारचे भूभाग ऑस्ट्रेलियातील न्यू साऊथ वेल्स राज्यात काही ठिकाणी आहेत. त्यामुळे कदाचित आपल्याला त्या ठिकाणीसुध्दा सोने मिळू शकेल. म्हणून तो १८५१च्या जानेवारी महिन्यात कॅलिफोर्नियाहून ऑस्ट्रेलियाला परत आला. आणि त्याचा अंदाज खरा ठरला! न्यू साऊथ वेल्समधल्या ओफायर इथे भूगर्भात सोने सापडले. त्यानंतर लगेचच ओफायरपेक्षा कितीतरी प्रचंड प्रमाणात व्हिक्टोरिया राज्यातील बॅलारॅट इथे सोन्याचे साठे सापडले. नंतर मात्र एकापाठोपाठ एक व्हिक्टोरिया राज्यातील अनेक भागात आणि मग संपूर्ण ऑस्ट्रेलियात बऱ्याच ठिकाणी सोने सापडत गेले आणि साऱ्या जगाचे लक्ष ऑस्ट्रेलियाकडे वेधले गेले. परिणामी जवळच्याच सिडनी व व्हिक्टोरिया प्रांतातून लोक आलेच पण साऱ्या जगातून देखील माणसांचे लोंढेच्या लोंढे जाऊ लागले. जर्मनी, इटली, इंग्लंड, अमेरिका, आयर्लंड, चीन इत्यादी देशांतून लोक तिथे गेले. संपूर्ण ऑस्ट्रेलियात जरी सोन्याचे साठे सापडले होते तरी बॅलारॅटमध्ये सोने सापडण्याचे प्रमाण प्रचंड होते. त्यामुळे अर्थातच तिथे जाणाऱ्यांचे प्रमाण खूपच होते. न्यू साऊथ वेल्समधील बरेच लोक कॅलिफोर्नियामध्ये सोने मिळत होते तेव्हा इकडचे कामधंदे सोडून कॅलिफोर्नियाला गेले होते. पण न्यू साऊथ वेल्स आणि व्हिक्टोरिया राज्यात सोने मिळत असल्याचे कळल्यावर परत उलटा ओघ सुरू झाला.

बॅलारॅटला जाण्यासाठी जवळचे मोठे शहर म्हणजे मेलबर्न. बॅलारॅट मेलबर्नपासून सुमारे १०० किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे आधी मेलबर्न गाठायचे; नंतर तिथून पुढे बॅलारॅटला. नंतर पुढे घोडागाडी, बैलगाडी किंवा चालत. बॅलारॅट-पासून दुसरे जवळचे गाव जिलाँग. जिलाँगपर्यंत बोटीने. तिथून चालत. बरेचसे लोक मेलबर्नमार्गे हातगाडीवर सामान टाकून चालत जात. हातगाडीवर खोदकामासाठी लागणारे सामान, बंदुका, तंबू, ब्लँकेट, कपडे इत्यादी गोष्टी घेऊन जय्यत तयारीनिशी जात. बॅलारॅट-मध्ये पोहोचल्या पोहोचल्या तंबू उभारून रहाण्याची व्यवस्था करत आणि मग खणायला सुरुवात. अर्थात इंग्लंड किंवा युरोपातील एखाद्या देशातून ऑस्ट्रेलियात जाणे ही सोपी गोष्ट नव्हती. जहाजे अडीच-तीन महिन्यांनी ऑस्ट्रेलियाला पोहोचत. खडतर प्रवासामुळे जहाजावर लोक आजारी पडत. काहीवेळा त्यात प्रवासी मृत्यू पावत. काही दुर्दैवी लोक जिलाँगजवळच खडकावर बोटी आपटून त्या फुटल्याने बुडून मेले. समुद्रप्रवास जरी जिकरीचा होता तरी सोन्याचे आकर्षणच एवढे तीव्र होते की जहाजांचे तांडेच्या तांडे ऑस्ट्रेलियाला जात. इंग्लंडमधील बरेच लोक कॅलिफोर्नियापेक्षा ऑस्ट्रेलियात जाणे पसंत करीत. कारण एकतर ऑस्ट्रेलिया म्हणजे इंग्लंडचीच एक वसाहत होती. तेथे ब्रिटिश कायदा लागू होता. त्याउलट कॅलिफोर्नियात कायदा वगैरे असा काही नव्हताच. कॅलिफोर्नियाप्रमाणेच ऑस्ट्रेलियात सोन्याच्या शोधात येणाऱ्या लोकांचा समज होता की जमीन खणायची; सोने मिळवायचे; परत जायचे. वृत्तपत्रात जास्त करून सोने मिळाले आहे अशाच बातम्या यायच्या. ज्यांना सोने मिळाले नाही त्यांच्याबद्दल काहीच छापून यायचे नाही. दुर्दैवाने त्या बातम्या वाचून हजारो लोक तेथे गेले. पण सत्य परिस्थिती जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकाला आल्यावर कळली. सोन्याच्या खाणीजवळ उभारलेल्या तंबूत रहाणे फारच कष्टप्रद होते. पुरेसे पाणी नाही; टॉयलेटचा पत्ता नाही; त्यामुळे उघड्यावरच शौचाला जायचे. सारा परिसर गलिच्छ; सर्वत्र कुबट वास. त्यात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तू महाग. जमीन खोदणे आणि सोने मिळविणे एवढे जिकरीचे असेल अशी त्यांना कल्पनादेखील नव्हती. आपण जर तेथे गेलो नाही तर दुसरा कोणीतरी जाऊन सोने घेऊन टाकेल. त्यामुळे लवकरात लवकर तेथे जायला हवे अशी लोकांची भावना होती. यश हे त्यांनी गृहितच धरले होते. अपयशाची शंकासुद्धा त्यांच्या मनाला शिवली नव्हती. त्यामुळे शेकडो लोक सहज सोने मिळत असल्याच्या बातम्या ज्यांनी पसरवल्या त्यांना शिव्या-शाप देत परत गेले. काहीजण तर जहाजातून उतरल्यावर वस्तुस्थिती लक्षात आल्यावर त्याच जहाजातून परत गेले. खाणीवरील जीवन कष्टाचे होते, तसेच ऑस्ट्रेलियात जायचा प्रवास कठीण असल्यामुळे सोन्याच्या शोधात येणाऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण २५-३० टक्केच होते, बऱ्याचशा महिला आपल्या नवऱ्याला, भावाला, मित्राला मदत करायला आल्या होत्या. तर काही लोक मुला-बाळांसकट आले होते.

सोने शोधणाऱ्यांना दिवसभर कष्ट करून मिळालेले सोने मेलबर्नला विकून जास्त पैसे मिळू शकले असते. पण वाटेत चोऱ्या-माऱ्या व्हायची भीती होती. हा धोका टाळण्यासाठी बरेच लोक बाजारभावापेक्षा कमी भावात तंबूजवळील सोने व्यापाऱ्यांना आपले सोने विकत असत. खाणीत काम करणाऱ्यांना खोदकाम करण्यासाठी परवाना घ्यावा लागत असे. त्यासाठी दर महिन्याला ३० शिलिंग शुल्क द्यावे लागे. लोकांना हे पैसे खूपच जास्त वाटत. कारण एकतर हे काम खूप कष्टाचे होते. शिवाय सोनं सापडो, न सापडो, त्यांना हे पैसे द्यावेच लागत. सोने शोधणाऱ्यांनी परवाना घेतला आहे की नाही ते पहाण्यासाठी गोल्ड कमिशनर अधूनमधून धाडी टाकत असे. एखादी व्यक्ती परवाना नसताना सोन्यासाठी खोदकाम करताना आढळली तर तात्काळ दंड केला जाई व दंड भरण्याइतके पैसे नसतील तर त्याची रवानगी सरळ तुरुंगात होत असे.

ऑस्ट्रेलियातदेखील सोन्याच्या शोधात येऊन खोदकाम करून सोने मिळविणाऱ्यांपेक्षा त्यांना लागणाऱ्या गरजेच्या वस्तू विकणाऱ्यांनाच जास्त फायदा झाला. आज बॅलारॅटमध्ये सोवरेन हिल नावाने पूर्वीची सुवर्ण नगरी जशीच्या तशी उभी केली आहे. आणि ते ऑस्ट्रेलियातील एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ झाले आहे. इथे खोल खाणीत तुम्हाला जाता येते. सर्वत्र त्या काळातील कपडे घालून लोक फिरत असतात. सैनिक परेड करत असतात. आपणही तिथल्या मातीत सोने शोधू शकतो. इथे एक गोल्ड म्युझियमदेखील आहे त्यात सोन्याचा एक मोठा दगड पहाण्यासाठी ठेवला आहे. तसेच निरनिराळ्या देशातील पूर्वीची सोन्याची नाणीदेखील ठेवली आहेत. भारतातील काही राजांची नाणीही इथे पहावयास मिळतात. सोन्याच्या शोधाने ऑस्ट्रेलियाचा कायापालटच झाला. सोन्याच्या

(पान ६ कॉलम ४ वर)

विनोदी लेख

एक अत्यंत महत्त्वाची बातमी-

# चुन्यावर बंदी

नंदकुमार कृष्णराव विजयकर

सरकारने देशातील सर्व चुन्याचा साठा आपल्या ताब्यात घेतला. चुन्याचे सर्व कारखाने सीलबंद केले.चुना बनवण्यावर सरसकट बंदी घालण्यात आली. या आदेशाची कोणी पायमल्ली केली तर त्याला जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्याची तरतूद करून ठेवली. इतकंच नाही तर परदेशातून चुना आयात करण्यावर देखील संपूर्ण बंदी घालण्यात आली.

या एका गोष्टीने देशात हलकल्लोळ माजला. इतकी वर्षे करोडो रुपयांचा चुना लावणारे घोटाळेबाज हवालदिल झाले. आता चुना आणायचा कोठून? चुना देशात नाही. परदेशातूनपण आणता येत नाही फार कठीण परिस्थिती ओढवली. पण यामुळे देशात एक अभूतपूर्व गोंधळ माजला. हे चुना प्रकरण काय आहे बऱ्याच लोकांच्या लक्षातच येईना. मोठा गोंधळ बांधकाम व्यवसाईकांत उडाला. दगड माती विटा चुना असा सगळा कच्चा माल घेऊन हे बिल्डर लोक ग्राहकांना चुना लावायचे. ६०/४०च्या हिशोबाने पांढऱ्या चुन्याने भरपूर काळी पुंजी जमवायचे.पण आता सर्व कठीण जाणार होते.बिचारे पानवालेतर बावरुनच गेले. गिऱ्हाइकला ' चुना लावू का?' म्हणून अदबीने विचारणारे हे पानवाले चुन्याअभावी रिकाम्या चुन्याच्या तांब्यावर दांडी मारून नुसताच ठणठणाट करू लागले. या सर्व गडबडीत मराठी सिनेमाच्या एका संगीत दिग्दर्शकावरसुद्धा मोठी आफत आली. त्याने संगीतबद्ध केलेल्या गीताचे बोल होते 'नाचू नाचू, नाचू नाचू' पण ते गीत चालीच्या आणि ध्वनिमुद्रणाच्या करामतीमुळे 'चुना चुना' असं ऐकू येत होतं.सेन्सॉरने एकतर 'ना' काढा किंवा 'चू' काढा असा कट सुचवला .शेवटी निर्मात्याने संपूर्ण गाण्याचाच 'चुना' काढला. गावोगावी खेड्यापाड्यात गरीबांच्या घरांना मात्र अवकळा आली. भिंतीला चुना लावतो असं म्हणायचीही सोय उरली नव्हती. चुन्याअभावी भिंती काळ्याठिक्कर पडल्या. तंबाखूवर चुना मळणाऱ्यांना चुन्याशिवाय तंबाखू गोड लागेना. त्यामुळे एक फायदा झाला, तंबाखू खाण्याचे प्रमाण कमी झाले.

देशात हा गोंधळ तर काही परदेशी सरकारं अस्वस्थ झाली. आता हेलिकॉप्टर, लढाऊ विमाने,तोफा यांचा सौदा करायला चुना कसा वापरायचा याचा अंदाज बांधणे मुश्कील झाले.यात बँकांना थोडा दिलासा मिळाला.आता त्यांना चुना लावायला कोणी धजणार नव्हते. मीडियावाले मात्र नाराज झाले. दर दोन दिवसांनी याने याला चुना लावला, त्याने त्याला चुना लावला अशा ब्रेकिंग्स न्यूजला ब्रेक लागला. पण एक गोष्ट कोणाच्याच लक्षात आली नाही.आता सरकारच चुन्याचे घाऊक मालक झाले होते. तेंव्हा सरकार प्रजेला चुना लावायला मोकळे होते!

*

## सोशल समाजाचा वर्धापनदिन सोहळा

रविवार, दि. १८ मार्च २०१८, गुढीपाडव्याच्या दिवशी सोशल समाजाने खार येथे आपला वर्धापन दिन साजरा केला. या १३० व्या वर्धापन दिनाच्या सोहळयाचे अध्यक्ष होते. श्री. राजन वामन जयकर (सी.ए.) 'जय शारदे वागीश्वरी' हे सरस्वतीस्तवन श्रीम. क्षमा कोठारे आणि सौ. योगिता नवलकर यांनी सादर केले. पाठोपाठच श्रीम. नलिनी तळपदे यांनी रचलेले आणि कै. श्री. प्रवीण राणे यांनी स्वरबद्ध केलेले 'समाजगीत' झाले. समाजाच्या विश्वस्त श्रीम. वृंदा जयकर यांनी त्यानंतर आपले मनोगत व्यक्त केले. या मनोगतात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन होते. तसेच सोशल समाजाच्या आगामी निवडणुकीत फॉर्म भरून सहभागी व्हा आणि समाजाच्या उपक्रमांना आर्थिक पाठबळही द्या असे आवाहनही केले. सामाजाध्यक्ष श्रीम. स्वाती राणे यांनी त्यानंतर प्रास्ताविक केले. नववर्षाच्या शुभेच्छा देताना प्रत्येकाला आपली 'स्पेस' मिळो आणि उर्जा लाभो असा शुभसंदेशही त्यांनी दिला. समाजाला आर्थिक पाठबळाबरोबर मनुष्यबळही गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. समारंभाध्यक्ष श्री. राजन जयकर यांचा परिचय त्यांनी करून दिल्यावर पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान केला गेला; तर त्यांच्या पत्नी सौ. अजिता यांना गजरा, मिष्टान्न देऊन गौरविण्यात आले. यावेळी नलिनी तळपदे रचित अध्यक्षाभिनंदन गीत क्षमा कोठारे यांनी सुरेख सादर केले. या गीताला श्री. राजन चितळे यांनी चाल बांधली होती. श्री. वसंत मोरे (संवादिनी) आणि श्री. अवधूत चौबळ (तबला) या द्वयीने सर्वच गीतांना वाद्यसाथ केली होती.

पुरस्कारप्राप्त मान्यवरांचा यथोचित परिचय सं. चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर आणि उपाध्यक्षा स्वाती जयकर यांनी करून दिला. संपूर्ण कार्यक्रमाचे नीटस सूत्रसंचालन नेहमीप्रमाणे संयुक्त चिटणीस सौ. नीता सेंजित यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी समितीचे सभासद श्री. अभिजित विजयकर यांनी आभार मानले. देणग्यांचे वाचन श्री. प्रसाद कीर्तिकर यांनी केले. श्री. राजन जयकर यांनी या प्रसंगी दिलेल्या रु. २५,०००/- देणगीसह इतर अनेकांनी दिलेल्या देणग्यांमुळे समाजाच्या गंगाजळीत सुमारे ७५,०००/- ची भर पडली. आर्थिक पाठबळ असावे या आवाहनाला मिळालेला हा सुखद प्रतिसाद होता. समाजाबद्दलची आपुलकीच यातून व्यक्त झाली. या झाल्या त्या दिवशीच्या ठळक नोंदी.

प्रमुख कार्यक्रम होता तो मानकऱ्यांचा सत्कार. मानकऱ्यांनी समाजाच्या विविध उपक्रमांचे मनापासून कौतुक केले. ज्ञातीच्या 'रजिस्ट्रेशन'साठी समाजाने घेतलेल्या पुढाकाराचे आणि परिश्रमाबद्दल त्यांनी विशेष अभिनंदन केले. मानकऱ्यांचा सत्कार करण्यापूर्वी समारंभाध्यक्ष श्री. राजन जयकर यांनीही मौलिक मार्गदर्शन केले. यशाचे उत्तुंग शिखर गाठताना मातापित्यांचे ऋण विसरू नका, त्यांचा सदैव मान राखा. कितीही यशाच्या शिखरावर गेलात तरी आपली नैतिक मूल्ये अवश्य पाळा जेणेकरून आईवडिलांची मान अभिमानाने उंचावेल. यशाच्या धुंदीत अमली पदार्थांची धुंदी नेहमीच दूर ठेवा. कुठेही, कोठल्याही क्षणी आपल्या वर्तनाने आपल्या आईवडिलांना काय वाटेल; याचा सदैव विचार करा आणि मुख्य म्हणजे एक माणूस म्हणून तुमचे काय स्थान आहे; याचा सदैव विचार करा. त्यांनी पा. प्र. सोशल समाजाचे मनापासून कौतुक केले. एक सनदी लेखापाल म्हणून साहजिकच त्यांनी तीन लाखावरून समाजाने आपली गंगाजळी तीस लाखापर्यंत घेतलेल्या उत्तुंग भरारीचे श्रेय अधोरेखित केले. विद्यमान समितीच्या उत्कृष्ट कार्यप्रणालीबद्दल त्यांनी काढलेल्या गौरवोद्गारांना उपस्थित असलेल्या प्रत्येकाने मनोमन 'मम' म्हटले असेल! श्री. राजन वामन जयकर यांचे कौतुक फक्त शब्दांतच बांधलेले नव्हते; ते सक्रीय होते. म्हणून त्यांची सर्व उपस्थितांना चहा, कॉफी आणि अल्पोपहार स्वत:तर्फे पाडव्याच्या शुभेच्छा म्हणून प्रयोजित करून एका नवीन प्रथेची 'गुढी' उभारली. त्याची गोडी वाढविणारी दर वर्षीप्रमाणे समाजातर्फे देण्यात येणारी कुल्फीही होतीच.

गुढी पाडव्यापासून सुरू होणारे नववर्ष ज्ञातीतील सर्वच संस्थांना नवनवीन उपक्रमांनी भरलेले, उत्साहाने, प्रतिसादाने भारलेले जावो अशी मनःपूर्वक शुभेच्छा!

*

(पान ३ कॉलम ४ वरून)

पिचकारी आपल्या सर्व मित्रांना अभिमानाने तो दाखवत सुटला. सर्वांकडे होते आपआपले 'हत्यार'. अविनाशकडे होती छोटी लाल वॉटरगन', विजूची निळी पाण्याची बाटली, अतुलकडे होती थोडीफार मोठी पिवळ्या रंगाची आकार नसलेली पिचकारी. पण बेस्ट होती ती दिनकरची- 'एक भली मोठी चामड्याची, बॅग पाईपर बॅग! बॅगेला होते पाच पाईप्स (नळकांड्या). बटण दाबताच ५ जणांवर ५ नळकांड्यातून एकाचवेळी पाणी फेक होत होती. मुलांनी आपआपल्या साधनसामग्री घेऊन एकमेकांवर पाणी व रंग उडवीत दिवसभर धुमाकूळ घातला. संध्याकाळ झाली. मुले आपआपल्या घरीही गेली. दिनकर घरी तर आला खरा पण आपली नवीन बॅग पाईपर बॅग त्याच्या हातातून सुटत नव्हती. आपल्या बाल्कनीतून पाणी खाली फेकणे चालूच ठेवले. सूर्यास्त झाला. डॉक्टर अंधेरीच्या हॉस्पिटलातून परत येत असावेत.आता आपण थांबलेले बरे, असा विचार त्याचा मनात आला. तितक्यात त्याची नजर समोर पडली. काही माणसे दुरून येत असलेली त्यानी पहिली. शेवटची गंमत करूया! माणसे आपल्या घराखाली आली असावीत, दिनकरने अंदाज बांधला. खाली लपून आपल्या पिचकारीच्या ५ नळकांड्या बाल्कनी बाहेर काढीत त्याने पाण्याचा वर्षाव केला.

ती माणसे म्हणजे एक प्रेतयात्रा होती. बिचाऱ्या दिनकरला त्याची कल्पना नव्हती. खालून रस्त्यातून आरडा-ओरडा सुरू झाला, ''तो बघा. वर दुसऱ्या मजल्यावरील बाल्कनीत एक मुलगा आहे. त्यानेच टाकले पाणी.''

''आपल्या मुलांना शिस्त लावत नाहीत.''

''काय रे पोरा, अक्कल आहे की नाही?''

''जाऊ द्या, लहान आहे.''

दरम्यान दिनकर आत आला. कदाचित नक्की काय घडले त्याची दिनकरला कल्पनाही नसेल. पण डॉक्टरांनी सारे काही पाहिले आणि ऐकलेदेखील. त्यांना अतिशय वाईट वाटले. झाल्या प्रकाराबद्दल खेद व्यक्त करून त्यांनी साऱ्यांची माफी मागितली.

डॉक्टरना राग अनावर झाला होता; क्रोधामुळे डोळे लालबुंद झाले होते.काहीशा रागात डॉक्टरानी घरात प्रवेश केला. दार उघडताच ते ओरडले, ''दि--न--क---र!''

(क्रमशः)

## पाठारे प्रभू चॅरिटीज

दरवर्षीप्रमाणे रविवार, दिनांक ११ मार्च २०१८ रोजी चॅरिटीजतर्फे सुरेश विठ्ठल सभागृहात वैद्यकीय चिकित्सा शिबीर भरविण्यात आले. चॅरिटीजच्या उपक्रमातील हे अठ्ठेचाळीसावे शिबीर होते. सेहेचाळीस ज्ञातीयांनी या शिबीराचा लाभ घेतला. हे शिबीर आयोजित करण्यात चॅरिटीजचे विश्वस्त डॉ. प्रदीप गजानन विजयकर यांचा पुढाकार होता. या शिबिरात हाडांची घनताही तपासण्यात आली.

खुद्द डॉ. प्रदीप गजानन विजयकर (जनरल प्रॅक्टिशनर) यांच्यासह या शिबीरात तपासणी करण्यासाठी खालील डॉक्टरांनी योगदान दिले. डॉ. सुनील दत्तात्रय आगासकर (ज. प्रॅ.) डॉ. विद्याधर सु. आगासकर (ज. प्रॅ.) डॉ. सौ. ऋतुजा तन्मय विजयकर (दंत चिकित्सक), डॉ. तन्मय प्र. विजयकर (होमियोपाथ), डॉ. सौ. मिताली म. नायक (होमियोपाथ), डॉ. परेश नवलकर (ज. प्रॅ.) डॉ. सौ. अश्विनी वाघ (शल्यविशारद), डॉ. फुलेन्द्र कोठारी (हृदयविकारतज्ञ), डॉ. गुजराथी (स्त्रीरोगतज्ञ), डॉ. कु. वैशाली न. अजिंक्य (होमियोपाथ), श्री. नितीन जे. कोठारे (पॅथॉलॉजिस्ट) आणि सौ. रजनी एन. कोठारे (पॅथॉलॉजिस्ट)

*

## पाठारे प्रभु महिला समाज

पा. प्र. महिला समाजाने ज्ञातीला उपयोगी असा भविष्यवेधी उपक्रम हाती घेतला आहे. सर्व ज्ञातीयांची नावे, पत्ते, मोबाइल क्रमांक आदी माहिती एकत्रित करून माहिती कोश हा समाज तयार करणार आहे. त्यासाठी ज्ञातीयांना आवाहन करण्यात येते की त्यांनी खालील क्रमानुसारे आपली माहिती कळवावी.

कुटुंबातील सर्वांची नावे. निवासी पत्ता. दूरध्वनी आणि भ्रमणध्वनी क्रमांक. ज्ञातीबाहेर लग्न झालेल्या मुलीचे आधीचे आणि आत्ताचे नाव. कुटुंबातील व्यक्ती वेगवेगळ्या ठिकाणी राहात असल्यास त्यांचा पत्ता. आपली माहिती खालीलपैकी कुठल्याही एका पत्त्यावर पाठवावी. ई-मेल - ppms.dir@gmail.com

सौ. नीता सेंजित - २१/ए, न्यू अश्विन को. ऑप. हौ. सोसायटी, ५१, टी.पी.एस.रोड, बाभई, बोरीवली (प.) मुंबई ४०००९१. फोन : ९८२०१६६६२८

श्रीमती वंदना नवलकर - १९-२३ सेठ ब्लॉक्स, १ ला मजला, नौरोजी शेठ स्ट्रीट, ठाकुरद्वार, मुंबई - ४००००२, फोन : ९८२०३३२५८८

सौ. पल्लवी कोठारे - १५ चंडिका सदन, ७ वा रस्ता, खार, मुंबई - ४०००५२. फोन : ९८६७६६४७८९

कु. शोभना जयकर १००२, विडीयोकॉन सुमुख सोसायटी, व्ही. पी. वर्दे मार्ग, गुरु नानक रोड, वांद्रे, मुंबई - ४०००५०. फोन : ९८२०५५६८४०

या माहिती कोशाकरिता जाहिरात देऊन आर्थिक पाठबळही द्यावे.

जाहिरातीचे दर पुढीलप्रमाणे - (पृष्ठ आकार ९'' × ६'')

१) कव्हर पान नं. २ रु. ४०००/-
२) कव्हर पान नं. ३ - रु. ४०००/-
३) कव्हर पान नं. ४ - रु. ५०००/-
४) आतील रंगीत पान - रु. ५०००/-
५) पूर्ण पान - रु. ३०००/-
६) अर्धे पान - रु. २०००/-

माहिती पाठविण्याची अंतीम तारीख - ३१-३-२०१८

* शनिवार दिनांक १४/४/१८ रोजी सायंकाळी ४ वाजता खार येथील सांस्कृतिक सभागृहात चैत्रातील वासंतिक हळदीकुंकू समारंभ देवीपुढे आराम करून साजरा होईल. त्यावेळी फॅन्सी ड्रेस स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा (मराठी आणि हिंदी) पाककृती, चित्रकला, रांगोळी आदी स्पर्धा घेण्यात येतील. (हा अंक १६ एप्रिल रोजी प्रसिद्ध होणार असल्याने या स्पर्धांचा अधिक तपशील देणे टाळले आहे - संपादक)

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शालाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचितक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचितक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### आत्याबाई नाव बोला

| | |
|---|---|
| १०-३-१० | श्वेत (रिजुल) प्रियेश सुरेन्द्र विजयकर, प्रभादेवी |
| २०-३-१८ | जीजा आदिनाथ महेश कोठारे, कांदिवली |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ४-२-१८ | श्री. आनंद धुंडिराज कोठारे, | वय ८२, | अंधेरी |
| ८-२-१८ | श्री. अविनाश मनोहर कोठारे, | वय ६५, | करेलवाडी |
| १-३-१८ | श्रीम. मीनल तळपदे भाटिया, | वय ७३, | ठाणे |
| १-३-१८ | श्री. अशोक केशवराव मानकर, | | गिरगाव. |
| ८-३-१८ | श्रीम. मंगला सुरेश शिवशंकर तळपदे, | वय ८५, | अंधेरी |
| ११-३-१८ | श्री. चिंतामणी दिनानाथ कोठारे, | वय ८८, | ठाणे |
| १५-३-१८ | श्री. अनिल केशवराव कोठारे, | वय ७४, | बोरीवली |
| १५-३-१८ | शुभांगिनी विश्वास म्हात्रे, (पुर्वाश्रमीच्या शुभांगिनी राणे) | वय ८५ | |
| १६-३-१८ | श्री. विलास दत्ताराम अजिंक्य, | वय ७९, | दादर-पोर्तुगीज चर्च |
| १९-३-१८ | सौ. उत्तरा ललित कोठारे, | वय ६८, | खार |
| २५-३-१८ | श्री. अरुण शरद अजिंक्य, | वय ६९, | खारघर |
| २९-३-१८ | श्री. सुरेश वसंतराव नवलकर | वय ८०, | खार |
| ४-४-१८ | श्री. प्रमोद माधव राणे | | भीमराव वाडी |
| ६-४-१८ | श्री. उदय (प्रकाश) दीनानाथ कीर्तिकर | वय ७८ | खार |

*चुकीची दुरुस्ती*

| | | | |
|---|---|---|---|
| ४-३-१८ | श्रीम. सुधा सुरेश प्रधान, | वय ८८, | मुलुंड |

मागील अंकातील या तपशीलातील तारखेची नोंद घ्यावी.

## प्रभुतरुणास देणगी

∗ २७ मार्च २०१८ या दिवशी श्री. पूर्णचंद्र केसरीनाथ राव यांच्या झालेल्या जन्मशताब्दीनिमित्त श्री. अनिल पूर्णचंद्र राव यांजकडून रु. १००१/-

∗ सौ. मनिषा आशित झावबा यांजकडून त्यांच्या सासूबाई श्रीम. ज्योत्स्ना शशिकांत झावबा स्मरणार्थ रु. ५०१/-

∗ सौ. प्रतिभा आणि श्री. सुरेंद्र गजानन विजयकर यांजकडून त्यांना नातू झाल्या प्रीत्यर्थ रु. ५००/-

∗ डॉ. ज्ञानदा लक्ष्मीकांत कोठारे यांच्या कॅनडातील यशाबद्दल त्यांचे भाचे श्री. यशोधन कमलाकांत अजिंक्य यांजकडून रु. १५१/-

⁕

## पत्र-प्रतिक्रिया

प्रिय सुहासिनी व वैजयन्ती,

मला तुम्हाला कळवायला आनंद होत आहे की माझं पुस्तक "Learning Hindustani Classical Vocal Music " published in USA by X'libris Publishing Co. Bloomington, Indiana हे जगातल्या खालील नावाजलेल्या वाचनालयांनी स्वीकारले आहे.

1. Library of U. S. Congress, Washington , USA.
2. Oxford University Library , Oxford, U. K.
3. Cambridge University Library, Cambridge, U. K.

तुमचा,

**पं. सुजन राणे**

अभिनंदन. -संपादक

## अभिनंदन

∗ पं. सुजन राणे यांनी प. भीमसेन जोशी, बिस्मिल्ला खान, फिरोज दस्तूर, आदींची त्यांनी चितारलेली तैलचित्रे पुण्याच्या ॲकॅडमीकरिता श्री. सुधाकर चव्हाण यांना भेट दिली. या भेट समारंभाचं उद्घाटन फेब्रुवारी महिन्यात श्री. श्रीनिवास भीमसेन जोशी यांच्या हस्ते झाले.

∗ डॉ. सुमन नवलकर यांच्या 'चिंध्यांची बाहुली' या बालकादंबरीला अमरावतीचा स्व. सुहास सावरकर स्मृति वाङ्मय पुरस्कार लाभला.

∗ 'विपुल श्री' मासिकाने घेतलेल्या वासंतिक कथास्पर्धेत डॉ. सुमन नवलकरांच्या कथेला प्रथम पारितोषिक लाभले.

∗ प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांनी ग्रंथालीच्या सहयोगाने दोन दीर्घ कादंबऱ्यांवर (कारवारी-माती - वसंत नरहर फेणे आणि धर्मधुरीण - डॉ. प्रकाश लोथे) मु. म. साहित्य संघात चर्चासत्र आयोजित केले होते. त्या चर्चेतही त्यांचा सहभाग होता. डॉ. अनंत लाभसेटवार पुरस्कृत १ लाखाचा पुरस्कार 'धर्मधुरीण' ला लाभला. त्या पुरस्कार वितरण सोहळ्याचेही त्यांनी आयोजन केले. 'अक्षरदालन' मध्ये त्यांचे दर महिन्याला एक याप्रमाणे कार्यक्रम होत असतात. जागतिक महिला दिनानिमित्त गिरगावातील नाना-नानी शाळेत त्यांचे व्याख्यान झाले. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय (दादर) या संस्थेचा वर्धापनदिन साजरा झाला. त्यावेळी वि. ह. कुलकर्णी पुरस्कारासाठी त्यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले आणि मनोगत व्यक्त केले. (या परीक्षणासाठी सहयोगी परीक्षक होत्या डॉ. सुषमा पौडवाल.)

∗ 'आम्ही उद्योजिका' या मीनल मोहाडीकर आयोजित विलेपार्ले, येथील शिबिरात श्री. मिलिंद मुकुंद कोठारे यांचे 'रेव्हेन्यू' वर मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. डॉ. स्नेहलता देशमुखांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या शिबिरात ज्ञातीतील उद्योजिका सौ. सुचेता जयेश कोठारे यांचाही सहभाग होता.

∗ महाराष्ट्र टाइम्समधील 'माझी जागा' सदरात सौ. मीना धराधर आंबवणे यांचा लेख प्रसिद्ध झाला.

∗ पुण्याच्या डॉ. दिनकर केळकर संग्रहालयाचे संस्थापक डॉ. केळकर यांच्यावरील इंग्रजी चरित्रग्रंथानंतर महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळातर्फे मराठी चरित्राचे 'मराठी दिनी' प्रकाशन झाले. इंग्रजी आणि मराठी अभ्यासू चरित्रांच्या लेखिका आहेत मृदुला प्रभुराम जोशी.

∗ डॉ. ज्ञानदा लक्ष्मीकांत कोठारे (एम्. एस. मुंबई विद्यापीठ) या कॅनडातील सस्केचन विद्यापीठात नागरिकांना, विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम करतात. याबद्दल विद्यापीठाचे प्रशस्तिपत्रक त्यांना प्राप्त झाले. तसेच 'फॅमिली फिजिशियन' म्हणून शैक्षणिक पात्रता प्राप्त केल्याबद्दल सर्टिफिकेशन इन द कॉलेज ऑफ फॅमिली फिजिशियन ऑफ कॅनडा (सीसीएफसी) ही पदवी पदवीदान समारंभात देण्यात आली.

∗ दादर येथील शिरीष पै काव्य कट्ट्यावर श्री. नंदकुमार विजयकरांनी कविता सादर केली. उषा मेहता, अशोक बागवे, भारतकुमार राऊत यावेळी उपस्थित होते.

(पान ४ कॉलम ४ वरून)

शोधात सबंध जगभरातून असंख्य लोक नशीब अजमावून पहाण्यासाठी आले. नंतर ते तिथेच स्थायिक झाले. त्यामुळे निरनिराळ्या देशातील निरनिराळ्या वंशाची, संस्कृतीची, जिद्दी, धाडसी, कष्टकरी अशी सोन्यासारखी माणसे ऑस्ट्रेलियाची नागरिक झाली. ऑस्ट्रेलियाला हा मोठ्ठाच फायदा झाला.

(संपूर्ण)

⁕

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67